11

**Government of Maharashtra**
**Deputy Director of Education**
**Nagpur Division, Nagpur**
Balbharti, N.I.T. Opposite Garden, Dhantoli, Nagpur.
Website: www.dydenagpur.org.
Phone No. 0712-2411318, E-mail: dydnagpur@rediffmail.com, dd.nagpur@mahedu.gov.in

Dis.No. Second/B/Self finance/Permission letter/4879/2023 Date:-23 JUN 2023

NOTARIAL REG.
ENTRY NO. 19630
DATE 11|07|2024

To,
Chairman/Secretary,
Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha,
Old Bagadganj, Nagpur

**Subject :-** Letter of approval for starting new school or upgrading existing school on self-financing basis under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012.. Priyadarshini Nagpur Public School managed by Lokmanya Tilak Janakalyan Shikshan Sanstha. Nagpur, Land Survey No. 291, Bhandara Road, Dist. Nagpur

**Reference:-**1) letter of intent No. SFS-1021/Pra.kra.359/SM-2 dated 14/9/2021 of School Education and Sports Department of Maharashtra Government
2) Letter of Approval No. SFS-1021/P.No.359/SM-2 Dated 26 April, 2023 of School Education and Sports Department, Government of Maharashtra Email Received Date 19/6/2023

Regarding the above you are hereby informed, that your organization has submitted a proposal for establishing a new school/upgrading an existing school for the academic year 2023-24 under the Maharashtra Self Financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012. As per the proposal your organization will be issued with letter of intent as per Governments resolutions referred at Sr. No.1 above, with terms and conditions, Now as per Governments resolutions referred at Sr. No. 2 above permission for setting up a new school, is given on the following terms and conditions.

| S.N | District | Name and address of applicant Society | Name and address of recognized school | New School/ Upgradation | Type of school | Circle Affiliation | School medium | year of recognition |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Nagpur | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha, Old Bagadganj, Nagpur | Priyadarshini Nagpur Public School, Land Survey No. 291, Bhandara Road, Dist. Nagpur | Upgrading | Higher Secondary in addition to Secondary School (Class 11 to Class 12 all branches) | CBSE | English | 2023-24 |

NOTARY
Suresh Sadashiv Meshram
Nagpur
Maharashtra India
Regn. No. 15840
My Term Expires on 06/12/2024
GOVT OF INDIA

**Terms and Conditions:-**

1. The said school will comply with all the standards, terms and conditions prescribed by the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra Right to Free and Compulsory Education Rules, 2011 and the directions issued by the Government under this Act or the directions or standards or terms and conditions specified by the Government from time to time.
2. It is mandatory for the registered society or trust or company to comply with all the standards, terms and conditions and the directions issued from time to time.by the Government as prescribed under the Maharashtra Self-Funding Schools (Establishment and Regulation) Act, 2012.
3. It is mandatory for the school managements to obtain a No-Objection Certificate from the government as per the instructions issued from time to time by the government while seeking affiliation from boards like CBSE OR CISCE OR CAIE OR IB. etc.

4. The management of school shall inform the concerned District Education Officer before the commencement of the academic year as approved by the Government.

5. The permission Granted for establishing of a new school or upgrading a school under the provisions of this Act, shall be valid only for the academic year for which it is granted.

6. The approval letter Stands cancelled, If the school management fails to start the school within eighteen months,

7. In future The school management cannot change the approved medium of education, location of the school without the permission of the Government.

8. If the school management establishes a school at a place other than the place permitted by the government, the permission of that school will be cancelled.

9. The recruitment of teaching and non-teaching staff in the permitted self-financed school should be done as per the prevailing rules and regulations of the Government.

10. While filling district wise information, the school to which permission has been granted shall fill the information as self-financing schools as a separate category and seek UD.I.S.E. Number. The State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been nominated as the Nodal Officer in this context.

11. It is necessary for the said institution to put up a board at the outside of the school entrance stating **"Self-financed Permitted School".**

12. The State Government may, at any time, cancel the letter of Permission on the ground of breach of any of the provisions of this Act or the rules made thereunder, or on failure to comply with any standards or Norms or terms and conditions issued by the Government from time to time. It will be mandatory to implement the existing prevailing rules of the government and the rules prescribed by the government from time to time.

------s/d-----
(Ulhas Nard)

Dy. Director Education
Nagpur Division, Nagpur

Copy to -

1. Hon'ble Principal Secretary, Department of School Education and Sports, Ministry, Mumbai- 32.for information with compliments.
2. Hon'ble Commissioner (Education), Commissioner ate, State of Maharashtra, Pune. For information with compliments.
3. Hon'ble Director of Education (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune. for information with compliments.
4. Hon'ble Director of Education (Primary), Directorate of Education, Maharashtra State, Pune-01.for information with compliments.
5. Education Officer (Primary/Secondary) Zilla Parishad Nagpur. for information and further necessary action. To inspect and report compliance to this office on whether the institution comply with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 ?
6. Principal Priyadarshini Nagpur Public School, Land Survey No. 291, Bhandara Road, Dist. Nagpur Forwarded for information.

ATTESTED
11/7/2024
Suresh Sadashiv Meshram
Advocate & Notary
Rani Durgawati Square, NIT
Complex, Flat No.A-5, 1st Floor,
Nagpur-17 Maharashtra

महाराष्ट्र शासन
विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर
बालभारती, एन.आय.टी. गार्डन समोर, धंतोली, नागपूर.
Website : www.dydenagpur.org.
दुरध्वनी क्रमांक ०७१२-२४११३१८, E-mail:dydnagpur@rediffmail.com, dd.nagpur@mahedu.gov.in

जा.क्र. माध्य/ब/स्वअर्थ/मान्यता पत्र/ ४१८ /२०२३ दिनांकः- 23 JUN 2023

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था,
ओल्ड बगडगंज,नागपूर

**विषय :-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर **नविन शाळा** सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी **मान्यता पत्र...**
**लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था.नागपुर संचलित प्रियदर्शनी नागपूर पब्लिक स्कुल,भुमापन क्र.२९१,भंडारा रोड,जि.नागपुर**

**संदर्भ :-**१) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा **इरादा पत्र क्र.** एसएफएस-१०२१/प्र.क्र.३५९/एसएम-२ **दिनांक १४/९/२०२१**
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा **मान्यता पत्र क्र.** एसएफएस-१०२१/प्र.क्र.३५९/एसएम-२ **दिनांक २६ एप्रिल,२०२३** ईमेल प्राप्त दिनांक १९/६/२०२३

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ नवीन शाळा** स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता अटी व शर्तीसह **इरादा पत्र** दिले होते, आता सदर नविन शाळा सुरु करण्याची संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर **मान्यता** दिलेली आहे.

| अ. क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | नविन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्नता | शाळेचे माध्यम | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागपूर | लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था, ओल्ड बगडगंज, नागपूर | प्रियदर्शनी नागपूर पब्लिक स्कुल, भुमापन क्र.२९१,भंडारा रोड,जि.नागपुर | दर्जावाढ | माध्यमिक शाळेला जोडुन उच्च माध्यमिक (इ. ११ वी ते इ.१२ वी सर्व शाखा) | सीबीएसई | इंग्रजी | २०२३-२४ |

**अटी व शर्ती**

१. सदर शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याव्दारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निर्देशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

१६. नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याव्दारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

१७. सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई किंवा सी.ए.आय.ई किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार शासनाकडून **ना-हरकत प्रमाणपत्र घेणे** अनिवार्य आहे.

१८. शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्हयाच्या शिक्षण अधिका-यास कळवील.

१९.या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

२०. शाळा व्यवस्थापनास **अठरा महिन्याच्या आत** शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७. शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८. शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतीरीक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती** शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०. जिल्हा निहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून स्वयंअर्थसहाय्यित शाळा अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. या संबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११. सदर संस्थेने **"स्वयंअर्थसहाय्यित परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

१२. या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

PRIYADARSHINI NAGPUR PUBLIC SCHOOL PNPS NAGPUR AFFILIATION No. 1130552

(उल्हास नरड) 23/6/23
**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग, नागपूर**

**प्रतिलिपी-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त (शिक्षण) आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित. सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे? याची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.
६. मुख्याध्यापक **प्रियदर्शनी नागपूर पब्लिक स्कुल,भुमापन क्र.२९१,भंडारा रोड,जि.नागपुर** यांना माहितीस्तव अग्रेषित.